**University of Mumbai**

**पायाभूत सुविधा नियोजन, अंमलबजावणी व देखभाल विभाग, मुंबई विद्यापीठ,**
पहिला मजला, विद्यानगरी परिसर,
सांताक्रूझ पूर्व, मुंबई -४०० ०९८
**ई:मेल-**cdu@mu.ac.in

IPEMD/2023

**Infrastructure Planning, Execution and Maintenance department, University of Mumbai,**
First floor, Vidyanagari Campus,
Santacruz East, Mumbai- 400 098
**E-mail :**cdu@mu.ac.in

युईव्ही/०१/१८३/२०२३ दिनांक : २९ एप्रिल,२०२३

# परिपत्रक

मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील सर्व वसतिगृहांचे अधिक्षक, (Warden) परिसरातील सर्व शैक्षणिक संकुल व विविध विभांगाचे प्रमुख, परिसरातील सर्व उपहारगृह चालक व बागबगीचा विभागातील संबधित प्रमुख यांचे निर्दशनाास पुढील बाबी आणुन देण्यात येत आहेत.

१) गेल्या दोन महिन्यांपून मार्च व एप्रिल २०२३ बुहन्मुंबई महानगर पालिकेकडून विद्यानगरी परिसरात होणाऱ्या दैनदिंन पाणी पुरवठयात मोठया प्रमाणात कपात करण्यात आली आहे. संपुर्ण मुंबई शहराला बुहन्मुंबई महानगर पालिकेकडून साधारणत: १५ ते ३०% कपातीने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सदर बाबत प्रिंट मिडीया, सोशल मिडीया, लेखी पत्र व दुरसंचार तसेच विविध वृत्तपत्रांमधून बुहन्मुंबई महानगरपालिका नागरिकांना पाणी कपात अटळ असल्याने पाणी जपुन वापरण्याबाबत वेळोवेळी आवाहन करत आहे.

२) सदर बाबतीत या विभागाने दि. १८/०३/२०२३ रोजी परिपत्रक काढून विद्यानगरी परिसरातील सर्व विभांगानी, वसतिगृहांनी व इतर पाणी वापर करणाऱ्या विभागांनी अंत्यत जबाबदारीने व काटकसरीने पाणी वापर करण्याबाबत अवगत केले आहे. त्यानंतरही बहुतांशी वसतिगृहे, अधिकारी, कर्मचारी वसाहतीत सातत्याने विहित वेळेपुर्वी पाणी संपत असल्याने सारखे टँकरने जादाचा पाणी पुरवठा करावा लागत आहे.

३) सदर टँकरद्वारे पाणी पुरवठा करताना विशिष्ट कालमर्यादितच टँकर उपलब्ध होईल याची खात्री नसते. कारण टँकर हे खाजगी मालकीचे असून बुहन्मंबई महानगरपालिकेचे पाणी उपलब्ध असणाऱ्या (Tapping Point) ठिकाणी संपुर्ण विभागातील बरेच टँकर्स हे प्रतिक्षेत

असतात व तिथे क्रमवारीनुसार टँकर्स भरुन मगच आपल्याला आपल्या पुरवठादारातर्फे टँकरद्वारे पाणी उपलब्ध होत असते. त्यात कधी कधी बराच कालपव्यय होत असतो. तरी ज्या विभागाला निर्दशनास आले की आपल्या विभागातील/वसतिगृहातील पाणी संपत आले आहे, त्यांनी त्यापुर्वीच पायाभूत सुविधा नियोजन अंमलबजावणी व देखभाल विभागास खाली दिलेल्या ई–मेल, Whats App क्रमांकावर किंवा भ्रमणध्वनीवर धारकांना कळविल्यानंतर, वरीलप्रमाणे टँकरला Tapping Point वर किती वेळेत पाणी उपलब्ध होईल त्यानंतरच पाणीपुरवठा करता येणे शक्य आहे. त्यामुळे विशेषत: सर्व वसतिगृहाच्या अधिक्षक (Warden) यांनी ओव्हरहेड टाक्यामधील पाणी पुर्णत: संपण्यापुर्वीच मागणी नोंदवावी, जेणेकरुन पायाभूत सुविधा नियोजन अंमलबजावणी व देखभाल विभागास टँकरद्वारे कमीत कमी वेळेत पाणी पुरवठा करणे शक्य होईल.

**विद्यानगरी परिसरातील पाणीपुरवठा मागणीसाठी पुढील ई–मेल व Whats App क्रमांकावर व भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.**

## वसतिगृहासाठी व शिक्षक वसाहतीसाठी संपर्क :–

- **श्री. विनोद निकम (क्लर्क ऑफ वर्क्स) – ८८५०७४८२३७**

  **Email ID : cdu@mu.ac.in , vinodvnikam@gmail.com**
- **श्री. मोघा भवारी (मेस्त्री) – ८६९१९९०४७६**

  **Email ID : cdu@mu.ac.in**
- **श्री. सुभाष काळे (मेस्त्री) – ९१३६३७७००७**

  **Email ID : cdu@mu.ac.in**

## इतर इमारतींसाठी संपर्क :–

- **श्री. अभिजीत मंडलिक (कनिष्ठ अभियंता) – ७७३८५२५१५८**

  **Email ID : cdu@mu.ac.in ,**
- **श्री. रिचर्ड गोन्साल्विस (कनिष्ठ अभियंता) – ९००४९६५७०६**

  **Email ID : cdu@mu.ac.in ,**
- **श्री. खालिद शेख (कनिष्ठ अभियंता) – ९७०२२९७०८४**

  **Email ID : cdu@mu.ac.in ,**

४) सद्य:स्थितीत संपुर्ण मुंबई शहरातच पाणी कपातीमुळे सुरळित पाणीपुरवठा होत नाही, ही बाब अधोरेखित आहेच. त्यामुळे विद्यानगरी परिसरातच टंचाई नसुन सर्वदूर पाणी कपातीने नागरिक हैराण आहेत. तरीही पायाभूत सुविधा नियोजन अंमलबजावणी व देखभाल विभाग बुहन्मुंबई महानगर पालिकेकडून उपलब्ध होणाऱ्या पाण्याची बचत करण्याबाबत वारंवार सर्व विभागांच्या निर्दशनास आणुन व आवश्यकतेनुसार तातडीने टॅंकरद्वारे पाणी उपलब्ध करुन देऊन पाणी पुरवठयात खंड पडणार नाही याबाबत दक्षता घेत आहे. तथापि काही विपरित परिस्थितीत, काही अनैसर्गिक कारणांमुळे किंवा Unavoidable Circmtances मुळे पाणी पुरवठा करण्यात अडचणी आल्या तर थोडा उशिराने का होईना पण पाणी उपलब्ध करुन देण्यात तत्पर असतो. त्यामुळे सर्व विभागांनी वरील प्रमाणे पुर्वसुचना देऊन (आगाऊ मागणी), पाणी वापरात बचत करुन व सर्व वसतिगृहातील विद्यार्थी, विविध विभागातील कर्मचारी यांचे निर्दशनास वरील सर्व वस्तुस्थिती आणुन पाण्याचा काटकसरीने वापर करुन मुंबई विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

**विद्यापीठ अभिंयता**
**मुंबई विद्यापीठ**

प्रत:—

१. **मा. कुलगुरु**, मुंबई विद्यापीठ,मुंबई ४०० ०३२ यांना माहितीकरिता सविनय सादर.
२. **मा. प्र–कुलगुरु**, मुंबई विद्यापीठ, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीकरिता सविनय सादर.
३. **मा. कुलसचिव**, मुंबई विद्यापीठ, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीकरिता सविनय सादर.
४. **श्री. विनोद निकम, श्री. मोघा भवारी, श्री. सुभाष काळे, सर्व कनिष्ठ अभियंता,** मुंबई विद्यापीठ, मुंबई ४०० ०९८ यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
५. बृहतनस्ती.